नि.फौ.ख.क्र. ४७२/२०२३

**नि.क्र. ४४ /क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नांवः** योगेश नवनाथ पवार,

**वयः** ४९ वर्षे **व्यवसायः** व्यापार ,

**राहणारः** १५५-अ, गोयल विहार, इंदोर.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकिल श्री. एस. पी. गवळे यांच्यामार्फत</u>**

१. माझा भाऊ सतिष पवार आहे व त्याची पत्नी अर्चना आहे. माझा भाऊ व भावाची पत्नी आरोपी राहुल मस्के व प्रविण पालवणकर यांच्याकडून घर घेणार होते. ते घर पालवण रोडचे होते. त्या घराचा व्यवहार रुपये २०,५०,०००/- ला ठरला होता. माझ्या भावाने व त्याच्या पत्नीने आरोपी राहुल मस्के व प्रविण पालवणकर यांना रुपये ७,००,०००/- दिले होते.

२. सदर इसम रजिस्ट्री करुन देण्यास टाळाटाळ करत होते. दि. २६.०५.२०२३ रोजी माझा भाऊ सतिष व त्याची पत्नी अर्चना असे राहुल मस्के याच्या घरी नगर नाका येथे राहुल मस्के व प्रविण पालवणकर यांना पैसे मागण्यास गेले होते. राहुल मस्के हा त्यावेळी घरी होता. तेव्हा राहुल मस्के माझ्या भावाला म्हणाला की, ‘प्रविण पालवणकर आल्यावर, पैसे परत करतो.’ तेव्हा प्रविण पालवणकर आला, त्याने वादविवाद करण्यास सुरुवात केली व त्यानंतर माझ्या भावाने मला फोन करुन राहुल मस्केच्या घरी बोलावले. त्यानंतर मी मस्के याच्या घरी गेलो.

३. मी राहुल मस्के यास म्हणालो की, 'तुम्ही घर नावावर करुन देत नाही व माझे भावाचे पैसे देत नाहीत.' तेव्हा राहुल मस्के याने माझ्या गालात चापट मारली व मला एक लाथ मारली. तेव्हा माझ्या भावाने मला त्या घराच्या बाहेर पाठविले. त्यानंतर राहुल मस्के याने हातात रॉड आणला व माझ्या डोळ्याजवळ मारले. त्यानंतर प्रविण पालवणकर व अजय मस्के यांनी मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिली.माझा भाऊ सतिष हा भांडण सोडविण्यास आला असता त्यास अजय मस्के याने त्याच्या हातातील काठीने सतिषच्या हातावर मारहाण केली. त्यानंतर माझ्या कारमध्ये बसून अजय मस्के व प्रविण पालवणकर यांनी माझ्या कारचे काचा फोडल्या. त्यानंतर मी रिक्षाव्दारे पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी मला शासकीय रुग्णालय बीड येथे उपचारासाठी पाठविले.

४. मला उपचार घेण्यास संध्याकाळ झाली. त्यानंतर उपचार घेवून मी पोलीस ठाण्यात गेलो. त्यानंतर रात्री २.०० वाजता पोलीसांनी माझी तक्रार लिहून घेतली. आता मला सदर तक्रार दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. त्यास **निशाणी क्र.४५** देण्यात येत आहे. आरोपी राहुल मस्के याच्या हातातील लोखंडी रॉड आणि अजय मस्के याच्या हातातील लाकडी काठी ज्याने मला मारहाण केली होती ते मला दाखविल्यास ओळखु शकतो. आता मला एक लोखंडी रॉड व एक लाकडी काठी दाखविली. (लाकडी काठी वेळूची आहे व ती अंदाजे तीन फुट लांबीची आहे, लोखंडी गज हा देखील ३.२५ फुट लांबीचा आहे.) ते हेच हत्यार आहेत. लोखंडी रॉडला **वस्तु क्र. अ** व लाकडी काठीला **वस्तू क्र. ब** देण्यात येत आहे.

५. दि. २८.०५.२०२३ रोजी पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा

माझेसमक्ष घटनास्थळी बनविला. घटनास्थळ मीच पोलीसांना दाखविले होते.

**सरतपास संपला**

**आरोपी तर्फे विधीज्ञ गैरहजर, करिता उलटतपास नाही.**

६.

श्रवणोत्तर स्वीकृत.

VASANT SHRIRAMJI YADAV
Digitally signed by VASANT SHRIRAMJI YADAV
Date: 2026.07.30 17:13:56 +0530

दि. २१.०७.२०२६ (वसंत एस. यादव)

५ वे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड.

**नि.क्र. ४४ /क**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे ॲड. श्री. एस. एस. सावंत यांच्यामार्फत निशाणी ४६ वरील आदेशावरुन</u>**

६. माझे शिक्षण इयत्ता बारावीपर्यंत झाले आहे. घराबाबतचा खरेदीविक्रीचा व्यवहार हा लिखीत स्वरुपात असतो. आरोपींसोबत माझे भावाचा व्यवहार लिखीत स्वरुपाचा नव्हता. सदर व्यवहारातील रक्कम धनादेश अथवा डिडिव्दारे दिली नव्हती. सदर व्यवहाराबाबत जाहीर प्रगटन दिले नव्हते. तसेच सर्व रिपोर्ट घेतला नाही. सदर व्यवहाराबाबत आमच्याकडे कोणताही लेखी कागद नाही हे म्हणणे बरोबर आहे.

७. घटनास्थळ हे अहिल्यानगर महामार्गच्या थोडया बाजूला आहे. सदर घटनास्थळ अंजली वाईन शॉप, क्लासिक हॉटेल याच्या जवळ आहे. महामार्गावर सतत लोक ये जा करतात. हे खरे नाही की, घटनास्थळ वर्दळीचे ठिकाण आहे. आरोपी क्र. ३ प्रविण माझा सख्खा भाऊ आहे. आरोपी क्र. ३ क्रुड ऑईलचा व्यवसाय करतो याची मला माहिती नाही. तो पुणे येथे मुलाबाळांसह स्थायिक आहे किंवा नाही याची मला माहिती नाही. आरोपी विशाल मस्के हा माळीवेस येथे राहतो हे मला माहीत नाही. आरोपी क्र. १ राहूल हा पालवणचा मुळचा राहणार आहे हे मला माहीत नाही. आरोपी क्र. १ राहूल याचे अहिल्यानगर महामार्गावर क्लासीक हॉटेल व बियरबार आहे याची मला माहिती नाही. माझी कार ही घटनेच्या दिवशी अहिल्यानगर रस्त्याच्या बाजूला असलेल्या बोळीमध्ये होती. तो अंतर्गत रस्ता अंदाजे १५ फुट रुंदीचा आहे.

८. असे घडले नव्हते की, मी हॉटेलच्या खाली रोडवर गाडी पार्क करुन हॉटेलमध्ये गेलो होतो. सदर बियरबारला स्वतंत्र पार्कींग आहे किंवा नाही

याची मला माहिती नाही. असे घडले नव्हते की, मी रस्त्यावर गाडी लावल्यामुळे तेथे गोंधळ निर्माण झाला. असे झाले नाही की, तेथे जमलेल्या लोकांमध्ये व माझ्यामध्ये वाद झाला. हे खरे नाही की, त्यानंतर मी सदर हॉटेलवर गेलो व तेथील व्यवस्थापकास म्हणालो की, त्यांच्या हॉटेलला पार्कींग नाही व त्यामुळे माझी गाडी फुटली. आरोपी क्र. ३ प्रविण पालवण येथील आहे. असे घडले नाही की, त्यानंतर मी आरोपी क्र. ३ प्रविण याला फोन केला व गाडी फोडल्याची घटना सांगितली. हे खरे नाही की, सदर कारच्या पार्कींगमुळे झालेल्या वादामूळे इतर लोकांनी मारहाण केल्यामुळे मला सदरील जखमा झाल्या. हे खरे नाही की, आरोपी क्र. ३ प्रविण याने मला सहकार्य न केल्यामुळे मी सर्व आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे खरे नाही की, माझा भाऊ व त्याची बायको घटनेच्या दिवशी घटनास्थळी हजर नव्हते. क्लासिक हॉटेल, अंजली वाईन तसेच बाजूच्या इतर दुकानांवर सिसिटिव्ही लावले आहेत याची मला माहीत नाही. हे खरे नाही की, माझ्या भावाचा व आरोपींचा कोणताही व्यवहार नव्हता. माझा व आरोपींचा स्वतंत्र कोणताही व्यवहार नव्हता. हे खरे नाही की, गाडीच्या वादामुळे खोटी फिर्याद दाखल केली. हे खरे नाही की, सरतपासात सर्व खोटे नमूद केले आहे.

**उलटतपास संपला**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

VASANT SHRIRAMJI YADAV
Digitally signed by VASANT SHRIRAMJI YADAV
Date: 2026.07.30 17:43:37 +0530

दि. ३०.०७.२०२६ (वसंत एस. यादव)

५ वे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड.